फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २०० अंतर्गत फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. २ चा जबाब

देवाची शपथ खरे सांगते,

माझे नाव : घनशाम भोजराज निंभोने
वय ४२ वर्ष धंदा - चालक
रा. नागपुर

फिर्यादी माझी पत्नी आहे. आरोपी क्र. १ व २ आमच्या घरासमोर राहतात. दि. १९.११.२०१७ ची घटना आहे. घरासमोर ठेवलेल्या विटा मी उचलुन घराजवळ असलेल्या खाली प्लॉट मध्ये ठेवत होतो. तेवढयात आरोपी क्र. १ आली आणि त्या प्लॉअमध्ये विटा ठेवायच्या नाही सांगु लागली. आरोपी क्र. १ ने मारण्याकरीता विट उचलली. आरोपी क्र. १ चा जावयाने तीच्या हातुन विट हिसकावली. त्यानंतर आरोपी क्र. २ आला जो की आरोपी क्र. १ चा मुलगा आहे. आरोपी क्र. २ ने मला मारण्यास सुरूवात केली. आरोपी क्र. २ ने फिर्यादीला ढकलेले. त्याने शिवीगाळ केली. त्याने 'साले, मादरचोद, तेरेको यहा रहने नही दुंगा' अशी शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपी निघुन गेले. माझया मुलीने १०० क्रमांकावर फोन केला. पोलीस घटनास्थळी आले. पोलीसांना मी हकीकत सांगीतली. पोलीसांनी पोलीस ठाण्यात जावुन तक्रार देण्यासाठी सांगीतली. मी व फिर्यादी पोलीस ठाण्यात गेलो. फिर्यादीने तक्रार दिली. पोलीसांनी कारवाई केली नाही. पोलीसांनी कोर्टामध्ये जाण्यासाठी सांगीतले.

माझे समक्ष,

(ए.ओ.जैन)
न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी,
न्यायालय क्र. ३, नागपुर
दि. ०२.०२.२०१८

(घनशाम भोजराज निंभोने)